**प्रधानमंत्री/ मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून तयार करण्यात आलेले रस्ते दहा वर्षानंतर देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रासयो-२०२२/प्र.क्र.१७५/बांधकाम-२**
मंत्रालय, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: २७ जुलै, २०२२

**संदर्भ-**

१) **ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः विसआ-२०१६/प्र.क्र.७/पंरा-७**
२) **ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांकः ग्रासयो-२०१९/प्र.क्र.७७/बांधकाम-२**

**प्रस्तावना-**

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अन्वये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत करण्यात आलेल्या पाच वर्षाचा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) संपल्यानंतर त्या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सदर रस्ते संबंधीत जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्यास व संबंधीत जिल्हा परिषदेने सदर रस्त्यांची आवश्यकतेनुसार देखभाल व दुरुस्ती करण्यास शासनाची मान्यता दिली आहे. तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ अन्वये मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्याचे ग्रामीण रस्ते परिरक्षा धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर ग्रामीण रस्ते परिरक्षा धोरण हे सर्व ग्रामीण रस्ते (जिल्हा परिषदांच्या अखत्यारित असेलेले इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत रस्ते) यांना लागू आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१२ मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजना/ मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांच्याअंतर्गत बांधकाम झालेल्या रस्त्यांची दहा वर्षाच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्तीसाठीची जबाबदारी महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेवर सोपविण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकरीता आशियायी विकास बँकेच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या मंजुरीच्या अहवालामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती दहा वर्षासाठी

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेकडून करण्याबाबत व त्यानंतर सदर रस्ते स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात यावे असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर योजनेतंर्गत ज्या रस्त्यांना दहा वर्ष पुर्ण झाले आहेत अशा रस्त्यांची जबाबदारी स्थानिक संस्थेवर म्हणजेच जिल्हा परिषदेवर असेल.

उपरोक्त दोन्ही शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या तरतूदीमधील विसंगती दूर करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाधीन होती. या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय अधिक्रमीत करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्यांचा पाच वर्षाचा दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) संपल्यानंतर त्या रस्त्यांची पाच वर्ष देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांचेमार्फत करण्यात यावी व एकूण दहा वर्षानंतर सदर रस्ते देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०७२७१७२२४१७०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e86ac5658c4f446f46a56052bf048257ffe4ea09078de9d556ae5babe8adc8b1, pseudonym=37D9D56800E3803E7F4DEAA21F9F7FAB712736F6, serialNumber=481AF6EECE7C1D432D3119135BE703BF6529E7A455A9B17708C677B565D8EE24, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2022.07.28 11:09:07 +05'30'

**(प्रविण जैन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन मुंबई.
६. सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
७. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
१०. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
११. अपर मुख्य सचिव , वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
१२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
१३. सचिव (मुख्यमंत्री ग्राम सडक योजना) यांचे स्वीय सहाय्यक.
१४. सर्व विभागीय आयुक्त.
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१७. मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मग्रारविसं, पुणे.
१८. उप सचिव (सर्व), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२०. राज्य गुणवत्ता समन्वयक, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, पुणे.
२१. अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मग्रारविसं, विभाग (सर्व).
२२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२३. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद (सर्व).
२४. कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मग्रारविसं, जिल्हा (सर्व).
२५. निवड नस्ती, कार्यासन बांधकाम-२ व ४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.